**<u>महाराष्ट्र शासन</u>**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

परिपत्रक क्र.नपप्रसं/मु.अ.-आस्था/रजा/सुचना/२०२१/कक्ष-२, 1847

शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,

वरळी, मुंबई-४०० ०३०.

दिनांक:- १६/२/२०२१. 12 5 FEB 2021

**वाचा - १) शासन नगर विकास विभाग परीपत्रक क्र.एमसीओ-२०१७/प्र.क्र.३४/नवि-१४, दि.७/३/२०१७.**

**२) शासन नगर विकास विभाग परीपत्रक क्र.एमसीओ-२०१७/प्र.क्र.३४/नवि-१४, दि.७/३/२०१७.**

**३) संचालनालय पत्र क्र.डिएमई-१०९१/सीआर-२१६/६, दि.२५/७/१९९९१ व क्र.नपप्रस/सं-मु-आस्था/परिपत्रक/ सेनि-वेतन/इतर लाभ/२०२०/कक्ष-२/१५०७, दि.३१/७/२०२०.**

**४) संचालनालय परीपत्रक क्र.नपप्रस/मु-आस्था/सेनि/सुचना/२०२०/कक्ष-२/२९५०, दि.१०/११/२०२०.**

## <u>परिपत्रक</u>

नगरपरिषद / नगर पंचायत येथे कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या रजा मंजूरी प्राधिकाराबाबत, उपरोक्त वाचा क्र.१ येथील परीपत्रक क्र.एमसीओ-२०१७/प्र.क्र.३४/नवि-१४, दि.७/३/२०१७ अन्वये शासन नगर विकास विभागाने पुढीलप्रमाणे कार्यवाही निश्चित केली आहे.

१) त्यानूसार संबंधीत जिल्हाधिकारी हे त्यांच्या जिल्हयातील नगरपरिषद / नगर पंचायत येथे कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या ३० दिवस कालावधीच्या रजा मंजूर करतील.

२) ३१ ते १८० दिवस रजा कालावधीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडून संचालनालयकडे सादर होवून संचालनालय स्तरावर निर्णय घ्यावा.

३) १८० दिवसांपेक्षा जास्त रजा कालावधीचे प्रस्ताव आयुक्त तथा संचालक- नगरपरिषद प्रशासन संचालनालय-मुंबई यांनी शासन नगर विकास विभागाकडे मंजूरीस्तव सादर करावेत.

४) दि.७/३/२०१७ च्या शासन परिपत्रकामध्ये महानगरपालिकेत कार्यरत मुख्याधिकारी यांच्या रजा प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत स्वतंत्रपणे सुचित करण्यात आलेले नाही.

०२. शासन नगर विकास विभाग परीपत्रक दि.७/३/२०१७ नूसार, ३१ ते १८० दिवसांपर्यंतच्या मुख्याधिकारी यांच्या रजेच्या प्रस्तावावर आयुक्त तथा संचालक यांनी निर्णय घ्यावयाचा आहे. तथापि मुख्याधिकारी यांच्याकडून थेट सादर होणारे व जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालयांकडून सादर होणारे रजा प्रस्ताव हे परीपूर्ण व आवश्यक कागदपत्रांसह सादर केले जात नसल्यामुळे, रजा प्रकरणे अनावश्यकरीत्या संचालनालय स्तरावर निर्णयाविना प्रलंबित राहातात, प्रलंबित राहीलेली आहेत. रजा प्रकरणे विहित कालावधीत निकाली निघावीत, विलंब टाळून गतिमानता येवून सुसुत्रीकरणाच्या दृष्टीने, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती, औद्योगिक नगरी अधिनियम-१९६५ च्या कलम-७४ मधील तरतुदींनूसार, शासनाने प्राधिकृत केलेल्या संचालनालयाच्या अखत्यारीतील ३१ ते १८० दिवस रजेबाबत, खालीलप्रमाणे प्राधिकारांमध्ये बदल करुन, प्राधिकार प्रत्यार्पित करण्यात येत आहेत. तसेच विभागांतर्गत कार्यरत सर्व मुख्याधिकारी यांची सेवापुस्तके ठेवणे व रजा प्रकरणी कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे पुन:श्च सुचित करण्यात येत आहे.

अ) <u>रजा मंजूरीबाबत</u> - नगरपरिषद / नगर पंचायत / जिल्हाधिकारी कार्यालय / विभागीय कार्यालय येथे कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांप्रमाणे, महानगरपालिका येथे कार्यरत अधिकाऱ्यांच्या, संचालनालयाच्या अखत्यारीतील ३१ ते १८० दिवसांपर्यंतच्या रजा-

१) जिल्हयांतर्गत नगरपरिषद / नगर पंचायत / जिल्हाधिकारी व अन्य कार्यालय येथे कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या, जिल्हाधिकारी यांनी, त्यांच्या अखत्यारीत मंजूर करावयाच्या रजा (पूर्वीचे प्राधिकार १ ते ३० दिवसांसह)

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम-१९८१ च्या

- नियम-५० नूसार, अर्जित रजा- १ ते ६० दिवस
- नियम-६० नूसार- अर्धवेतनी रजा- १ ते ६० दिवस
- नियम-६१ नूसार-वैद्यकीय प्रमाणपत्राआधारे- १ ते ६० दिवस परिवर्तीत रजा (दुप्पट अर्धवेतनी रजा खर्ची टाकून)
- नियम-६३ नूसार-असाधारण रजा - १ ते ६० दिवस

२) विभागांतर्गत नगरपरिषद / नगर पंचायत / जिल्हाधिकारी कार्यालय / विभागीय व अन्य कार्यालय येथे कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक - नगरपरिषद प्रशासन यांनी त्यांच्या अखत्यारीत मंजूर करावयाच्या रजा, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम-१९८१ च्या,

- नियम-५० नूसार, अर्जित रजा- ६१ ते १२० दिवस
- नियम-६० नूसार- अर्धवेतनी रजा- ६१ ते १२० दिवस
- नियम-६१ नूसार-वैद्यकीय प्रमाणपत्राआधारे- ६१ ते १२० दिवस परीवर्तीत रजा (दुप्पट अर्धवेतनी रजा खर्ची टाकून)
- नियम-६३ नूसार-असाधारण रजा- ६१ ते १२० दिवस

३) महानगरपालिका येथे कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या, महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांच्या अखत्यारीत मंजूर करावयाच्या रजा, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम-१९८१ च्या,

- नियम-५० नूसार, अर्जित रजा- १ ते १२० दिवस
- नियम-६० नूसार- अर्धवेतनी रजा- १ ते १२० दिवस
- नियम-६१ नूसार-वैद्यकीय प्रमाणपत्राआधारे- १ ते १२० दिवस परीवर्तीत रजा (दुप्पट अर्धवेतनी रजा खर्ची टाकून)
- नियम-६३ नूसार-असाधारण रजा- १ ते १२० दिवस

४) विभागांतर्गत नगरपरिषद / नगर पंचायत / जिल्हाधिकारी कार्यालय / विभागीय व अन्य कार्यालय येथे कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक - नगरपरिषद प्रशासन यांनी त्यांच्या अखत्यारीत / महानगरपालिका येथे कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या, महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांच्या अखत्यारीत

- मुख्याधिकारी संवर्गातील २ मुले हयात असलेल्या महिला अधिकाऱ्यांना मंजूर करावयाच्या व रजा खाती खर्ची न टाकावयाच्या, प्रसुति रजा १८० दिवस व बालसंगोपन रजा १८० दिवस, संपूर्ण सेवा कालावधीमध्ये किती मुले हयात आहेत हे विचारात न घेता गर्भपातामुळे प्रसुति रजा ४५ दिवस इ.

अ) शासन वित्त विभाग निर्णय दि.२८/७/१९९५, दि.२४/८/२००९, दि.१५/१/२०१६ मधील अटी-शर्तीनूसार व महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम-१९८१ च्या,
- नियम-७४ नूसार, प्रसुति रजा- १८० दिवस

ब) शासन वित्त विभाग निर्णय दि.२८/७/१९९५ मधील अटी-शर्तीनूसार,
- मुलाच्या संगोपनासाठी १८० दिवस बालसंगोपन रजा.

क) शासन वित्त विभाग निर्णय दि.२८/७/१९९५ मधील अटी-शर्तीनूसार,
- गर्भपातामुळे संपूर्ण सेवा कालावधीमध्ये किती मुले हयात आहेत हे विचारात न घेता कमाल ४५ दिवस प्रसुति रजा.

५) संचालनालय स्तरावरुन जिल्हा / विभाग / महानगरपालिका व अन्य कार्यालयांतर्गत कार्यरत सर्व मुख्याधिकारी संवर्ग अधिकारी यांच्या, १२१ ते १८० दिवस अर्जित, अर्धवेतनी, परीवर्तीत, असाधारण रजा मंजूरीबाबतची कार्यवाही करण्यात येईल. मुख्याधिकारी यांचे १२१ ते १८० दिवस अर्जित, अर्धवेतनी, परीवर्तीत, असाधारण रजेचे परीपूर्ण प्रस्ताव सेवापुस्तक रजा लेखे स्वाक्षरीत प्रत व अन्य आवश्यक कागदपत्रांसह विभागीय कार्यालयांनी / महानगरपालिकांनी विभागाकडून सेवापुस्तक रजा लेखे स्वाक्षरीत प्रत प्राप्त करुन घेवून अन्य आवश्यक कागदपत्रांसह परीपूर्ण प्रस्ताव संचालनालयाकडे सादर करावयाचे आहेत.

**ब) <u>सेवापुस्तक जतन करावयाचा स्तर</u> -**

१) शासन नगर विकास विभाग निर्णय दि.५/१०/२०१२, संचालनालय पत्र दि.२५/७/१९९१, दि.३१/७/२०२० व परीपत्रक दि.१०/११/२०२० अन्वये विभागांतर्गत नगरपरिषद/नगर पंचायत/जिल्हाधिकारी कार्यालय/विभागीय कार्यालय व महानगरपालिका येथे कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणांबाबतची कार्यवाही संबंधीत विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक-नगरपरिषद प्रशासन कार्यालयांनी करण्याबाबत वेळोवेळी सुचित करण्यात आले आहे.

सेवानिवृत्ती प्रकरणाची कार्यवाही ही बहुतांश सेवापुस्तकातील सेवाविषयक बाबींच्या नोंदीवर आधारीत असते. त्या अनुषंगाने, एकसुत्रता व सुव्यवस्थितपणाच्या दृष्टीने, विभागांतर्गत नगरपरिषद / नगर पंचायत / जिल्हा, विभागीय कार्यालय व महानगरपालिका येथे कार्यरत मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची सेवापुस्तके संबंधीत विभागीय स्तरावरच ठेवण्याचे विभागाना पुन:श्च सुचित करण्यात येत आहे.

२) ज्या मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची सेवापुस्तके विभागीय स्तरावर न ठेवता अद्यापही अन्यत्र, विशेषत: महानगरपालिका स्तरावर ठेवण्यात आली आहेत, त्यांची सेवापुस्तके विभाग स्तरावर ठेवली जातील याबाबत प्रादेशिक उप संचालक-नगरपरिषद प्रशासन यांनी आवश्यक ती कार्यवाही करुन, तसा पुर्तता अहवाल संचालनालयास सादर करण्याचे सुचित करण्यात येत आहे.

३) जिल्हा स्तरावरुन व महानगरपालिका स्तरावरुन, रजा मंजूर करताना, संबंधीत मुख्याधिकारी यांचे सेवापुस्तकातील अद्ययावत रजा लेखे स्वाक्षरीत प्रत विभागाकडून प्राप्त करुन घेवून, रजा मंजूर करण्याची कार्यवाही करावी. तसेच जिल्हा स्तरावरुन रजा मंजूर करुन रजेचे आदेश विभागाकडे रजा लेखे अद्ययावत करण्यासाठी सादर करावेत, विभागानी सेवापुस्तकात रजेची नोंद घेवून रजा लेखे अद्ययावत करण्याचे सुचित करण्यात येत आहे.

सदरचे परिपत्रक संचालनालय वेबसाईट <u>**www.mahadmamaharashtragovin**</u> वर प्रसिध्द करण्यात आले आहे.

KSh

( डॉ.किरण कुलकर्णी-भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय-मुंबई

प्रत -

१) मा.प्रधान सचिव-नवि-२-नगर विकास विभाग, मंत्रालय-हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
२) प्रादेशिक उप संचालक- नगरपरिषद प्रशासन- विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय (सर्व विभाग)
३) जिल्हा प्रशासन अधिकारी - नगरपरिषद प्रशासन (सर्व)
४) आयुक्त- महानगरपालिका (सर्व)
५) मुख्याधिकारी (सर्व)
६) उप-८ - e-gov. - [illegible]

CO-रजा मंजूरी-प्राधिकार-सुधारणा